I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 154-157
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# आदिवासी विकासात महिला सक्षमीकरणाचे महत्व

**प्रणाली शेंडे[१] व संतोष अ. कावरे[२]**
[१,२]खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर (म.रा.)
*Corresponding Author :- pranalishende1234@gmail.com, kaware12sa@gmail.com

| Communicated : 20.01.2023 | Revision : 28.02.2023<br>Accepted : 27.03.2023 | Published : 30.05.2023 |
|---|---|---|

**सारांश :**

भारतीय समाजात अनादी काळापासून पुरूष आणि महिला यांच्या कार्याची विभागणी झालेली दिसून येते. श्रमविभाजनामुळे जास्तीत जास्त प्रमाणात महिलांना कौटूंबिक कार्य वाटयास आल्याचे दिसते. भारतात असलेल्या आदिवासी जमातीमध्ये बहुतांश जमाती या पितृसत्ताक व्यवस्था असणाऱ्या आहेत. आज घडीला खासी, गारो, नायर या जामतीत मातृसत्ताक व्यवस्था असणाऱ्या असल्या तरी मात्र प्रगत समाजाच्या संपर्कामुळे त्यांच्यावरही पितृसत्ताक जीवनपध्द्तीचा प्रभाव दिसून येतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने लोकशाही व्यवस्था स्विकारून भारतातील वंचित, दुर्बल अशा सर्व तळागळातील समाजाचा विकास साध्य करण्याच्या हेतूने अनेक कल्याणकारी योजना राबविण्यास सुरूवात केली. त्यास आदिम समाजही अपवाद नाही. वर्षानुवर्ष प्रगत समाजापासून दुर असलेला आणि अनेक अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा आणि पारंपारीक जिवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचा सुध्दा विकास साध्य करून त्यांना आधुनिक समाजाच्या प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले आणि ते आजतागायत सुरू आहे.

भारतीय समाजाप्रमाणे आदिवासी समाजात सुध्दा स्त्री आणि पुरूषांचे प्रमाण बरोबरीचे आहे. तेव्हा या दोनही घटकांचा विकास साधण्याबरोबरच विशेषत: महिलांचे सक्षमीकरण होणे गरजेचे आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात केवळ पुरूषानाच नव्हे तर महिलांना सुध्दा आधिकाधिक प्रवेश कसा देता येईल या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. कारण कोणत्याही कुटूंबाचा गावाचा राज्याचा आणि देशाचा सर्वांगिण विकास साध्य करायचा असेल तर आदिवासी महिलांचे सक्षमीकरण होणे काळाजी गरज आहे आणि म्हणून सकल आदिवासी विकासात महिला सक्षमीकरणाचे महत्व अनन्यसाधारण असे आहे.

**मुख्यशब्द :** सक्षमीकरण, विकास, आदिवासी, महिला, पितृसत्ताक

## प्रस्तावना :

आपल्या 'भारत' देशात एकुण लोकसख्यांपैकी अर्धी लोकसंख्या महिलांची आहे. त्यामुळे देशाचा संपूर्ण विकास हा महिलांच्या योगदानाशिवाय होऊ शकत नाही. भारतात आदिम काळापासूनच जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी पुरूषांच्या बरोबरीने मिळून कामे केली. कामाचे स्वरूप भिन्न असले तरीही स्त्रियांनी स्वत:च्या कार्यक्षमतेच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटविलेला आहे आणि आजतागायत स्त्रि प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे. महिला सक्षमीकरण हे भौगोलिक दृष्टया जसे नागरी, ग्रामीण, शैक्षणिक दृष्टया सामाजिक स्थितीनुसार ज्यात जात आणि वर्ग तसेच वय अशा विविध घटकांवर अवलंबुन असते. महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रीयेला चालना देण्यासाठी ७३ व्या घटनादुरूस्तीतुन महिलांसाठी आरक्षण ठेवले गेले.

आदिवासी महिलांचे सक्षमीकरण असो अथवा इतर कुठल्याही समाजातील स्त्रीयांचे सक्षमीकरण असो हा त्या समाजातील सामाजिक, आर्थिक विकासासाठी महत्वाचा टप्पा आहे. म्हणूनच मोठया प्रमाणात स्त्रिया या सशक्त होणे सक्रिय असणे आवश्यक आहे. सक्षमीकरणामध्ये शिक्षण, उत्तम आरोग्य सेवा, उत्पादक साधनांवर समान मालकी हक्क, सामाजिक, आर्थिक आणि व्यावसायीक क्षेत्रामध्ये स्त्रीयांचा सहभाग तसेच विविध अधिकार, जबाबदाऱ्याची जाणीव, स्वाभिमान, आत्मनिर्भरता, सूशिक्षीतपणा आणि मुख्य म्हणजे आत्मविश्वास या सगळया बाबींचा समावेश होतो. भेदभाव आर्थिक गैरसोय, महिलांवरील हिंसा तसेच यावरील समाजपातळीवरील कायदे आणि धोरणांची अमलंबजावणी ही मोठया प्रमाणात पितृसत्ताक रचना आहे जी भारतातील बहुतेक भागांमध्ये समाज आणि कौटूंबिक रचनेवर पातळीवर नियंत्रण ठेवते.

**अध्ययनाचा उद्देश:—**

उपरोक्त संशोधनाद्वारे आदिवासी विकास होत असतांना महिलांची काय भूमिका आहे आणि तिचा कितपत विकास साध्य होत आहे हे अभ्यासणे.

**गृहितकृत्ये :—**

१. आदिवासी महिला आज जीवनाच्या विविध क्षेत्रात पुढाकार घेत आहे.

२. आदिवासी महिला आर्थिक, सामाजिक क्षेत्रात पुरूषांच्या समांतर कार्य करीत आहे.

३. आदिवासी महिलात शिक्षणाचे प्रमाण वाढत चालले आहे.

४. वस्तुस्थितीत आजही आदिवासी महिलांवर अन्याय, अत्याचार होत आहे. त्यामुळे ती पुर्ण सबला झाली. असे म्हणता येत नाही.

**तथ्य संकलन:—**

सदर संशोधनासाठी द्वितीयक स्त्रोतांच्या आधार माहिती गोळा करण्यात आली. याकरिता संबंधीत विषयाच्या अनुषांगाने वृत्तपत्रे, मासिके, शोधप्रत्रिका, पुस्तके आणि इंटरनेटचा उपयोग करण्यात आला आहे.

**महिला सक्षमीकरण :—**

८ मार्च हा जागतीक महिला दिन म्हणून आपण साजरा करतो. १९९० च्या दशकात सुरूवातीस स्त्री—पुरूष समानतेवर अधिक भर दिला आणि याच दशकात शेवटी महिला सबलीकरण करण्यात आले.सबलीकरण म्हणजेच महिलांना सशक्त बनविणे, त्यांचे सशक्तीकरण करणे अथवा त्यांना सक्षम बनविणे त्यांचे सक्षमीकरण करणे हे होय. आणि यासाठी लोकांमध्ये जनजागृती करणे तसेच महिलांना भेडसावणाऱ्या विविध समस्या लक्षात घेवून त्यावर उपाय योजना करणे तसेच त्यासाठी नवनवीन उपक्रम राबविले जातात. देशातील स्त्री—पुरूषांच्या विकासाद्वारे संबंधीत देशाचा सर्वांगिण विकास ठरविल्या जातो. म्हणूनच राष्ट्राच्या विकासामध्ये स्त्री विकास महत्वाचा ठरतो आणि हा स्त्री विकास होण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण आवश्यक आहे.

**आदिवासी विकास आणि आदिवासी महिला :—**

आदिवासी हा शब्द 'आदि' आणि 'वासी' या दोन शब्दांपासून बनला असून त्याचा अर्थ 'मुळ' असा होतो. भारताच्या सामाजिक जडण—घडणीमध्ये आदिवासी लोकसंख्या अविभाज्य घटक आहे. भारतीय राज्यघटेत आदिवासींना अनूसूचित जमाती ॅ;ज्द्ध म्हणून ओळखल्या जाते.प्रामुख्याने ते जंगले, टेकडया तसेच नैसर्गिक साधनांनी समुध्द अशा पठारी भागातील दुर्गम भुभागात राहतात. भारताच्या लोकसंख्येच्या ८.६ टक्के म्हणजेच २०११ च्या जनगणेनुसार १० कोटी आहे. एकंदरीत जनगणनेनुसार आज आदिवासी लोकांची लोकसंख्या सुमारे १८.४ कोटी आहे. ज्यात मोठा भाग आदिवासींचा आहे. 'महात्मा गांधींनी' आदिवासींना 'गिरिजन' म्हणून संबोधले भारतातील प्रमुख आदिवासी समुदाय म्हणजेच गोंड, आंध, खरवार, मुंडा, खाडिया, बोडो, कोल, भील, कोळी, सहारियाा, संथाल, भूमिज, ओराव, लोहरा, बिरहोर, पारधी, असूर, भील, भिलाला, मीना, टाकणकार इत्यादी होय.

आदिवासी समाजातिल स्त्रीयांचा विचार करता त्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक जीवनपध्दतीत महत्वाची भुमिका वढवितात. परंतु रोजगार, शिक्षण, उत्तम आरोग्य आणि आर्थिक सक्षमीकरण यासारख्या जीवनाच्या विवीध क्षेत्रात त्या अजूनही मागे आहेत. कुठल्याही सामाजाचा विकास करावयाचा असेल तर सर्व प्रथम त्या समुदाय समाजातिल स्त्रीयांचा विकास गरजेचे आहे. कारण कुटूंबातील एका स्त्रीचा जरी विकास झाला तर ती आपल्या संपूर्ण कुटूंबाच्या विकासाचे इतर मार्ग उघडण्यास सुरूवात करते. आदिवासी महिला या आजतागायत जरी विविध क्षेत्रात दिसत असल्या तरी त्यांचे प्रमाण हे अत्यल्प

आहे. म्हणूनच आदिवासी विकास दृष्टिकोनाचा विचार करता विषमता, भेदभाव आणि शोषण यावर मात करून महिलांचे शैक्षणिक, आर्थिक, राजकीय सक्षमीकरण करून आदिवासी समाजाचा सर्वांगिण विकास साधता येईल.

**आदिवासी महिलांची स्थिती:—**

आदिवासी महिलांची स्थिती लक्षात घेता आजही त्या प्रगत जसे ग्रामीण, नागरी स्त्रीयांच्या तुलनेत मागासलेलाच आहे. त्यांच्यात शिक्षणाचा अभाव, तांत्रिक उपकरणासंबंधी माहितीचा अभाव विविध कौशल्ये आणि प्रशिक्षणाचा अभाव, कुपोषण, विविध आरोग्य विषयक सुख सुविधांचा अभाव, आर्थिक मागासलेपणा पहायला मिळतो. आदिवासी महिला या आर्थिक दृष्टया कमकुवत गरीब आणि सामाजिक दृष्टया मागासलेल्या दिसतात व त्या पध्दतीने त्या जीवन जगतात. वेळप्रसंगी त्यांना घरगुती हिंसा, बलात्कार, विविध क्षेत्रात त्यांची पिळवणुक शोषण यासारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. आदीवासी सामाजातील स्त्री ही शिक्षीत होत असली तरी प्रचलीत असणाऱ्या पितृसत्ताक पध्दती प्रमाणे पुरूषप्रधान संस्कृतीप्रमाणे तीच्यावर विविध निर्णय लादले जातात तसेच निर्णय घेण्याची अकार्यक्षमता तिच्यात पहावयास मिळते.

समाजातील महिलांची स्थिती ही त्या समाजातील पातळीचे स्वरूप, प्रतिबिंब असते. स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन म्हणजेच त्यांचे उत्पन्न, शिक्षण, रोजगार, उत्तम आरोग्य, प्रजनन क्षमता, कुटूंबातील त्यांचे स्थान समाजामधील त्यांचे स्थान आणि भुमिका होय. समाजातील महिलांची स्थिती आणि महिला सक्षमीकरण यांचा फार जवळचा संबंध आहे. महिला जर सक्षम असतील तर सहाजिकच त्यांची स्थिती ही उत्तम असेल. स्त्री ही मुळातच कलेनी निपुण असते आणि या कलेला जर शिक्षणाची साथ मिळाली तर कुटूंबाच्या समाजाच्या देशाच्या विकासाच्या दृष्टीने उत्कृष्ट दर्जाचे ठरेल.

**महिलांचे सक्षमीकरणाकरीता उपाययोजना व शिफारशी:—**

स्त्री सक्षमीकरण म्हणजेच स्त्रियांना स्वावलंबी बनविणे असा अर्थ होतो. ज्या देशातील शिक्षीत स्त्रियांचे प्रमाण अधीक, तो देश विकसीत शिक्षणामुळे स्त्री सक्षम होण्यास मदत होते. तिला तिच्या अधिकाराची जाणीव होते. विविध उपाययोजना तसेच शिफारशींच्या माध्यमातुन महिलांचे सक्षमीकरण करता येईल.

१. महिलांचा विकास करण्याकरीता जास्तीत जास्त प्रमाणात सहज व सुलभ शिक्षण मिळायला हवे.

२. महिलांच्या सक्षक्तीकरणाकरीता कायदा व समाज यांचे संरक्षण देण्यात यावे.

३. स्त्री व्यक्तिमत्व विकासाला चालना देणे.

४. स्त्रीयांना आर्थिक दृष्टया प्रबळ होण्यासाठी विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दयावा.

५. अशिक्षीत, आदिवासी, गरीब महिलांमध्ये जागरूकता निर्माण करण्याकरीता महिला जागरूकता अभियान सुरू करून त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात यावे व त्यासंबंधी शिबीर घेण्यात यावी.

६. राजकीय क्षेत्रामध्ये स्त्रियांना संधी मिळावी या करिता प्रोत्साहित करावे.

७. स्त्रियांनी स्वत:मधील न्युनगंडाची भावना कमी करून आत्मविश्वास निर्माण करावा.

८. महिलांनी स्वत: पुढाकार घेवुन पुरूषांचे व अनिष्ठ प्रथांचे वर्चस्व झुगारायला हवे.

९. महिलांच्या मानवाधिकाराची रक्षा करण्यात यावी.

१०.व्यावसायिक आणि तांत्रीक सेवामध्ये महिलांना योग्य प्रतिनिधीत्व देण्यात यावे.

११.समाजातील अनिष्ठ प्रथा व परंपराचे निर्मुलन करायला पाहिजे.

१२. महिलांना महिला विषयक विवीध कायद्याची माहिती द्यायला पाहिजे.

१३. AMSY आदिवासी महिला सक्षमीकरण योजना ही दुर्गम अशा भागात पोहचली जावी जेणे करून त्याचा फायदा तळागाळातील आदिवासी महिलांना होईल.

वरील उपाययोजना व शिफारशींचे पालन करण्यात आले तर महिलांना सामाजिक न्याय मिळून त्यांना समाजात प्रतिष्ठेच स्थान प्राप्त होईल.

**निष्कर्ष :—**

'आदिवासी विकासात महिला सक्षमीकरणाचे महत्व' लक्षात घेताना महिला या सशक्त असणे गरजेचे आहे. आज शिक्षण, सेवा साहित्य, उद्योग, क्रिडा, शेती, कला राजकारण, तांत्रिक अशा विविध क्षेत्रात कामगिरी केली तरी सुध्दा दुसऱ्या बाजुला हुंडाबळी, विनयभंग, स्त्रियांची विक्री, बलात्कार, लहान मुलींचे शोषण, स्त्रि भृणहत्या अशा प्रकारचे अमानुष अत्याचार वाढले आहेत. अशा विविध आमानुष अत्याचाराला विरोध करण्यासाठी स्त्रीयांनी सक्षम होणे अनिवार्य आहे. त्याकरीता स्वत: महिलांनी स्वत:ची मानसिकता बदलवून येईल त्या परिस्थितीला तोंड देणे गरजेचे आहे.

आदिवासी विकासात महिलांचे सक्षमीकरण झाले असता त्याचे दोन फायदे होऊ शकतात. पहिला म्हणजेच आदिवासी महिला ही आर्थिक दृष्टया सक्षम झाली तर त्या समाजाचेच नव्हे तर पर्यायाने राष्ट्राच्या उत्पादनाच्या प्रवाहात उत्पन्नाचा वाटा उंचावेल आणि दुसरा म्हणजेच स्त्रियांमधील मुळत:च असणारी गुणवत्ता, जबाबदारी, कामातील चीकाटी, समय सुचकता अशा विविध घटकामुळे त्या राष्ट्राच्या आर्थिक यशातिल व विकासामधील महत्वाचा घटक ठरू शकतात.

**संदर्भ :**

गोटे शुभांगी, (२००४) 'महिला सक्षमीकरण स्वरूप व समस्या', वरद प्रकाशन, औरंगाबाद.

भारद्वाज निधी, 'महिला सशक्तीकरण'

शर्मा प्रज्ञाराणी, (२००६), 'महिला विकास और सशक्तीकरण', अविष्कार प्रकाशन, दिल्ली

सिंह निशांत, (२०११), स्त्री सशक्तीकरण—एक मुल्यांकन, खुशी पब्लिकेशन, गाजीयाबाद.

कऱ्हाडे डॉ. बी. एम., (जुन २०१४), 'आदिम जमातीचे समाजशास्त्र', प्रकाशक मनोहर पिंपळापुरे, महाल नागपूर

सिद्धीकी डॉ. एम. के. ए. (मई १९८४), 'भारत के आदिवासी' प्रकाशक, निर्देशक 'भारतीय मानव विज्ञान सर्वेक्षण भारत; सरकार २७, जवाहरलाल नेहरू मार्ग कलकत्ता.